**PM-USHA या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत व्यवस्थापन, संनियंत्रण, मुल्यांकन आणि संशोधन (MMER) (केंद्र हिस्सा १०० %) (अनुसूचित जमाती घटक) राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांना उपलब्ध करुन देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०२६/ई-१६६६११५/विशि-३**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २७ मे, २०२६.

पहा:-

१. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग शासन निर्णय क्र.F.No.१ (२७)/ PFMS/ २०२० दि.१३.०७.२०२३
२. भारत सरकार, शिक्षा मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. F.No. २४-२७/ २०२६-U.Policy, दि. ३१ मार्च, २०२६
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७.०५.२०२६
४. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक, बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दिनांक १३.०५.२०२६

प्रस्तावना :

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान/ प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यात सदर योजनेचे व्यवस्थापन, संनियंत्रण, मुल्यांकन आणि संशोधन (Management, Monitoring Evaluation and Research) करण्यासाठी राज्यामध्ये राज्य प्रकल्प संचालनालय स्थापन करण्यात आले आहे. राज्य प्रकल्प संचालनालयाला त्यांच्या कार्यान्वयनासाठी या योजनेंतर्गत एकूण मंजूर निधीच्या १% इतका निधी केंद्र शासनाकडून (MMER) अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येतो. केंद्र शासनाने संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये सदर योजनेसाठी अनुसूचित जमाती या घटकाकरीता रू. ५,००,०००/- इतका निधी (Mother Sanction) उपलब्ध करून दिला आहे.

त्यानुसार, व्यवस्थापन, संनियंत्रण, मुल्यांकन आणि संशोधन या घटकासाठीच्या अनुसूचित जमाती या उपघटकासाठी केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेला निधी राज्य प्रकल्प संचालक,

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये प्राप्त PM-USHA या केंद्र पुरस्कृत योजनेच्या व्यवस्थापन, संनियंत्रण, मुल्यांकन आणि संशोधन या घटकासाठीच्या अनुसूचित जमाती या उपघटकासाठी केंद्र शासनाने (केंद्र हिस्सा १०० %) उपलब्ध करून दिलेला निधी रू. ५,००,०००/- (रूपये पाच लक्ष फक्त) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना (BEAMS) अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर वितरित करण्यास राज्य शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त निधी मागणी क्र.टी-५, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठ व उच्च शिक्षण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान- व्यवस्थापन, संनियंत्रण, मुल्यांकन आणि संशोधन (केंद्र हिस्सा १०० %) (कार्यक्रम) २२०२ एल ३५१, कार्यक्रम खर्च ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यात येत आहे.

३. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र -१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२, नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांचेकडे तपासणी करीता राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांनी सादर करावीत.

४. राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांना केंद्र शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी मंजूर केला आहे त्या निधीचा वापर त्या प्रयोजनासाठी करावा. खरेदी व बांधकामाची मान्यता विद्यापीठ लेखासंहितेनुसार सक्षम प्राधिका-यामार्फत घेण्यात यावी.

५. तसेच, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच तद्नंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार सदरची खरेदीप्रक्रीया विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर पार पाडावी व विहित कालावधीमध्ये सदरचा खर्च पुर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दिनांक १३.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

७.      सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२७१५१८०६३६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.05.27 15:19:01 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१. मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रक्षशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) संचालनालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा वअनुज्ञेयता) / लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग,(व्यय-५), (अर्थसंकल्प-३/८), मंत्रालय, मुंबई.
९. आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६), मंत्रालय, मुंबई
१०.अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवड नस्ती (विशि -३), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.